दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● बुधवार २४ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २५१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# अमित शाह यांचं अकोल्यात SC, ST आणि OBC आरक्षणावर सर्वात मोठं भाष्य

## मोदी सरकारने हिंदू, बौद्ध, शीख, जैन आमच्या शरणार्थी बंधूंना नागरिकता देण्याचं काम केलं, असं अमित शाह म्हणाले.



**वादळवार्ता/अकोला**

अकोल्याचे महायुतीचे उमेदवार संजय धोत्रे यांच्या प्रचाराच्या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची आज अकोल्यात जाहीर सभा पार पडली. या सभेत त्यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. काँग्रेसकडून चुकीचा प्रचार केला जातोय. भाजप संविधान बदलणार नाही. तसेच SC, ST आणि OBC आरक्षणाला कुणीही हात लावणार नाही, असं अमित शाह म्हणाले. "जोपर्यंत भाजप आहे, तोपर्यंत या देशातून एससी, एसटी आणि ओबीसींचं आरक्षण कुणीही हटवू शकत नाही. ही मोदींची गॅरंटी आहे", असं अमित शाह आपल्या भाषणात म्हणाले. अमित शाह यांनी यावेळी कलम 370 वरुनही काँग्रेसवर निशाणा साधला. यावेळी अमित शाह यांनी अकोल्याच्या नागरिकांना महायुतीचे उमेदवार संजय धोत्रे यांना मतदान करण्याचं आवाहन केलं. तसेच भाजपकडून काय-काय कामे करण्यात आली, याबाबतची माहिती अमित शाह यांनी आपल्या भाषणातून दिली. "ट्रिपल तलाक हटवलं पाहिजे की नको? पण काँग्रेस पक्ष म्हणतो, ते वापस आले तर ट्रिपल तलाक घेऊन येणार. मी आज अकोल्यावाल्यांना सांगू इच्छितो, ना काँग्रेसला येऊ देणार, ना ट्रिपल तलाकला येऊ देणार.

अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेशमध्ये हिंदू, बौद्ध, शीख, जैन आमच्या सर्व बंधूंवर अत्याचार झाले. महिला, मुलींवर बलात्कार करण्यात आला. त्यांना सुरक्षा द्यायची की नाही? ते भारताच्या शरणात आले. मोदी सरकारने हिंदू, बौद्ध, शीख, जैन आमच्या शरणार्थी बंधूंना नागरिकता देण्याचं काम केलं. काँग्रेस म्हणतं आम्ही सीएए रद्द करना. जोपर्यंत भाजपचा एक छोटा मुलगाही जिवंत आहे तोपर्यंत आम्ही सीएएला हात लाऊ देणार नाही", असं अमित शाह म्हणाले. 'तोपर्यंत या देशातून एससी, एसटी आणि ओबीसींचं आरक्षण...' "काँग्रेस पक्ष खोटं पसरवत आहे की, भाजपला 400 जागांवर विजय मिळाला तर आरक्षण चाललं जाईल. अरे काँग्रेसवाल्यांनो, आम्हाला संविधान बदलण्याची ताकद या देशाच्या जनतेने 10 वर्षांपासून दिली आहे. जनतेने 2014 मध्ये पूर्ण बहुमत दिलं, 2019 मध्ये देखील दिलं. आम्ही आरक्षण हटवलं नाही. आम्ही काय हटवलं? आम्ही पूर्ण बहुमताचा उपयोग तीन तलाक हटवण्यासाठी केलं, कलम 370 हटवण्यासाठी केलं, दहशतवाद संपविण्यासाठी केलं आणि सीएए आणण्यासाठी केलं. अकोल्याच्या नागरिकांना मी आज मोदीजींची गॅरंटी म्हणून सांगून जातो, जोपर्यंत भाजप आहे, तोपर्यंत या देशातून एससी, एसटी आणि ओबीसींचं आरक्षण कुणीही हटवू शकत नाही. ही मोदींची गॅरंटी आहे", असं आश्वासन अमित शाह यांनी दिलं. "पूर्ण विदर्भात आणि सिंचन परियोजनांमध्ये नरेंद्र मोदी सरकार आणि एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस सरकारने भरपूर काम केलं आहे. भाजप विदर्भात पाण्याच्या योजनांसाठी कटिबद्ध आहे. जवळपाल 79 हजार कोटी रुपयांची वैनगंगा-नलगंगा इंटरलिंकिंग योजनेला आम्ही मंजुरी दिली आहे, ज्यामुळे अकोल्याचा दुष्काळ कायमचा समाप्त होईल. या योजनेमुळे नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यांची जवळपास 4 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. हे भाजपने केलं आहे. आमच्या सरकारने अकोल्यात ई बस चालू केली. सामगाव-जालना रेल्वे मार्गासाठी 50 टक्के निधी राज्य सरकारने घेऊन रस्ता चालू केला. 160 कोटींचं विदर्भ-मराठवाडा डेअरी प्रोजेक्ट टाकलं", अशा विविध कामांची अमित शाह यांनी माहिती दिली.

## केज शहरात एका तरुणाचा धारदार शस्त्राने खुन

**वादळवार्ता / केज**

केज शहरातील क्रांतीनगर येथे सायंकाळी ७ ते ८ च्या दरम्यान एका युवकावर धारदार शस्त्राने मानेवरती हल्ला करून खुन करण्यात आला आहे. याबाबत वृत्त असे कि केज शहरातील क्रांतीनगर येथे सायंकाळी ७ ते ८ च्या दरम्यान एका युवकावर धारदार शस्त्राने मानेवरती हल्ला करून गंभीर जखमी केले त्यानंतर त्यास स्थानिक रहिवाश्यांनी तात्काळ उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरानी त्यास तपासाअंती मृत्यु घोषित केले असुन त्या मृत्यु झालेल्या तरून युवकाचे नाव गोरख महावीर हजारे वय-१७ व्यवसाय बिगारी काम मु.पो. क्रांतीनगर असे आहे . दरम्यान क्रांतीनगर येथील रहिवासी तथा गोरख महावीर हजारे याचे आई- वडिल नातेवाईकानसह जो पर्यंत आरोपीला अटक करणार नाहीत तोपर्यंत केज पोलीस ठाण्यासमोरून उठणार नाहीत असे सांगितले.



## केज तालुक्यात कलाकेंद्रांच्या नावावर चालतोय जुगार...

**वादळवार्ता/केज**

कला म्हणजे विविध घटकांची अनुभूती देणारी मांडणी. त्यामध्ये चित्रकला,शिल्पकला,नाट्यकला आशा विविध गोष्टी येतात कला केंद्र हे कला सरावाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि थिएटर स्पेस, गॅलरी स्पेस, संगीताच्या परफॉर्मन्ससाठी ठिकाणे, कार्यशाळा क्षेत्रे, शैक्षणिक सुविधा, तांत्रिक उपकरणे इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशिष्ट परवाना असलेले एक कार्यात्मक समुदाय केंद्र होय. परंतु याच कलाकेंद्रांवर कांहि बेकायदेशीर गोष्टी घडतात आणि तेथील नागरीक त्रस्त होतात. या बाबत सविस्तर वृत्त असे कि केज तालुक्यातील विडा येथे राज कला ,क्रिडा व सांस्कृतिक कलाकेंद्र आहे . त्या कला केद्रांवर १००० हजार ते ५०० रुपये प्याक हा जुगार सर्रासपणे चालु असुन विडा गावातील गावकऱ्यांना यामुळे त्रास होत असून सदरील कला केद्रांवर तात्काळ कारवाई करावी असे निवेदन गावकऱ्यांच्या वतीने केज पोलिस ठाण्यात देण्यात आले आहे . सदरील निवेदनावर दिनेश रामभाऊ ढोबळे, निलेश लिंबा ढोबळे, दिपक मच्छिंद्र वाघमारे, शिवाजी दादाराव वाघमारे, साजन दगडु वाघमारे , प्रकाश लक्ष्मण वाघमारे इत्यादींच्या सह्या आहेत.

# जग बदलणारा बापमाणूस या पुस्तकाचे अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात प्रकाशन.

**नाशिक/सुरेश इंगळे**

अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात आंबेडकर इंटरनॅशनल मिशन च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या समारोहात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्रावर लेखक व वक्ते जगदीश ओहोळ यांनी लिहिलेले प्रेरणादायी पुस्तक "जग बदलणारा बापमाणूस" या पुस्तकाच्या दहाव्या आवृत्तीचे प्रकाशन अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती महोत्सव कार्यक्रमात मोठ्या थाटात अनेक आंतरराष्ट्रीय मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या जयंती महोत्सवात विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात प्रमुख व्यक्ती म्हणून हारवर्ड विद्यापीठाचे स्कॉलर, लेखक, विचारवंत, डॉक्टर सुरज ऐंगडे तर प्रमुख पाहुणे म्हणून चारुदत्त म्हसदे, नाशिक येथील संविधान प्रचारक शिवदास म्हसदे ,कोलंबिया विद्यापीठातील अनेक दिग्गज मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. या सर्व मान्यवरांच्या हस्ते "जग बदलणारा बापमाणूस" या पुस्तकाच्या दाहव्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. हे पुस्तक नव्या पिढीला जागतिक व सर्वव्यापी बाबासाहेब सांगणारे पुस्तक आहे.



संपादकीय

# अलंकार

अलंकार म्हणजे दागिना. मग हा दागिना माणुसकीचा असू दे, प्रेमाचा असू दे, दातृत्वाचा असू दे.हे सर्व दागिने माणसाला फार शोभून दिसतात.आणि एका स्त्रीला अलंकाराने शोभा येते.

बघा ना माणुसकी जर का माणसात नसेल तर काय होईल हो?

माणुसकी हा विषय काढला की मला प्रार्थना आठवते. उटुंब चित्रपट - माणसाने माणसाशी माणसासम वागणे.

माणूस हा असा आहे की तो माणसाशी माणसाप्रमाणे वागला तर खूप काही वादविवाद होणार नाहीत. माणुसकी असा एक दागिना आहे की माणूस त्यामुळे समाजात उठून दिसतो.

रस्त्यावर एखादी वृद्ध व्यक्ती दिसते आणि त्याला रस्ता ओलांडायचा आहे तर आपण रस्ता ओलांडायला मदत करावी. कोणाचे एक्सीडेंट झाला असेल तर त्याच्याकडे कोणी लक्ष देत नसेल तर आपण स्वतः त्याची काळजी घ्यावी. पोलिसांना फोन करावा. त्याचा जीव वाचेल इतकी आपण काळजी घ्यावी.

बऱ्याचदा असं होतं की एक्सीडेंट झालाय माणसं त्याला टाकून पुढे निघून जातात. कारण काय महत्त्वाचे आहे की पोलिसांचा ससेमीरा मागे लागायला नको. पण या भीतीपोटी पुढे माणूसकी टाकून चालेल का हो.

ही अगदी साधी उदाहरणं दिलेली आहेत माणुसकी या अलंकाराबद्दल.

आता पण प्रेम हा अलंकार पाहू या. प्रेम लहान मुलाचे आईवर आईचे लहान मुलावर. प्रेम वडिलांचे मुलांवर मुलांचे वडिलांवर. आजोबाआजीचे नातवावर,नातवांचे आजोबा आजीवर, पूर्ण कुटुंबाचे एकमेकांवरील प्रेम. पतीचे पत्नी वरील प्रेम, पत्नीचे पतीवरील प्रेम, प्रेयसीच्या प्रियकरावर प्रेम, प्रियकराचे प्रेयसीवर प्रेम, संपूर्ण मानव जातिचे निसर्गावरील प्रेम. मानवाचे घरावरील प्रेम,प्राण्यांवरील प्रेम, अशी कितीतरी उदाहरणं प्रेमाची आपल्याला देता येतील. तर प्रेम हा एक अलंकारच आहे ना. ज्याच्याकडे प्रेमाचा झरा पाझरतो, तो जीवनात उत्साही,आनंदी,टवटवीत असतो.

आता पण दातृत्वाचा वेगळा अलंकार पाहू या. आपण काही जे कमवतो त्यातील थोडासा भाग आपण आपल्या समाजाकरता वापरायला हवा. मग कुठे आर्थिक स्थिती प्रबळ नाही तो समाज. यांना दोन वेळचे अन्न पण नीट मिळत नाही तो समाज. शाळेत जायची इच्छा असते पण फी भरायला पैसे नसतात असा समज. फ्री ऍडमिशन मिळालं तरी वह्या,पुस्तकांचा खर्च तर करावाच लागतो असा समाज. या सर्वांप्रती आपले एक कर्तव्य आहे असं समजून आपण या लोकांसाठी अन्नदान,शैक्षणिक साहित्य दान, वस्त्र दान अशा गोष्टी केल्या पाहिजेत.

पर्यावरणासाठी, वृक्षारोपणासाठी रोप दान सुद्धा आपण केले पाहिजे. म्हणजे निसर्ग भान आपण ठेवून एक सामाजिक बांधिलकी जपू शकतो.

आता स्त्री सौंदर्यामध्ये भर घालणारे जे अलंकार आहेत अलंकारांबद्दल बोलूया.

अलंकार आणि स्त्री यांचे वर्षानुवर्षांचे नाते आहे. सोन्याचे दागिने, हिऱ्याचे दागिने,मोत्याचे दागिने, ऑक्सडाईजचे दागिने आणि आता इमिटेशन ज्वेलरी आलेली आहे. प्रत्येक साडीवर मॅचिंग दागिने आलेले आहेत.

तर असे हे दागिने घालून, अलंकार घालून, स्त्री ही अतिशय सुंदर दिसते.देखणी दिसते.

तर अलंकाराच्या ह्या विविध व्याख्या आहेत. अलंकार मानवाने सजवले तर मानव जीवनामध्ये अतिशय उत्कृष्ट कार्य करू शकतो. समाजाचे ऋण फेडू शकतो. निसर्गाचे ऋण खेळू शकतो. मानवा अलंकार वापर माणुसकीचा झरा वाहू दे अनाथालयी प्रेमाचा आनंद देऊ वृद्धाश्रमात दातृत्वाचा स्त्रीला लोभ असतो या अलंकारांचा....

# महाबली हनुमान

जय हनुमान ज्ञान गुन सागर
जय कपीश तिहु लोक उजागर
राम दूत अतुलित बल धामा
अंजनी पुत्र पवनसुत नामा
जय श्रीराम जय हनुमान

महान संत कवी गोस्वामी तुलसीदास लिखित हनुमान चालीसा आपणा सर्वांना माहितच आहे. आज २३एप्रिल २०२४ शनिवार म्हणजे चैत्र पौर्णिमा हनुमान जयंती होय. चैत्र महिन्यातील पौर्णिमा तिथीच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी हनुमान जयंती साजरी केली जाते.राम जन्मानंतर सातव्या दिवशी हनुमान जयंती साजरी केली जाते. महारुद्र हनुमान भगवान शंकराचा अकरावा अवतार आहेत असे म्हटले जाते.महाबली बजरंग बली हनुमान हे श्री प्रभू रामाचे परमभक्त आहेत. प्रभू श्रीरामाचे त्रेतायुगातील अवतारकार्य पूर्ण झाल्यानंतर कलियुग संपेपर्यंत हनुमानाने पृथ्वी लोकी राहून चांगले आचरण करणाऱ्याचे दुर्जनापासून रक्षण करावे अशी प्रभू श्री रामाची इच्छा होती. त्यांची इच्छा म्हणून हनुमानाने ही सेवा स्वीकारली आहे.आजही कलियुगात संकटमोचन हनुमानाचे चिरंजीव अस्तित्व दिसून येते.

महाबली हनुमान उर्फ मारुती ही रामायणातील एक प्रमुख लोकप्रिय व्यक्तिरेखा असून हनुमान हा प्रभू रामाचा महान परम भक्त,दास,दूत मानला जातो. त्याचा जन्म अंजनी या वानरीनच्या पोटी अंजनेरी येथे झाला होता.हे गाव व या नावाचा डोंगरी किल्ला महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात आहे. मारुतीच्या वडिलांचे नाव केशरी होते.मारुती हा अतिशय ताकदवान महाबली होता. त्याला अनेक सिद्धी प्राप्त झालेल्या होत्या. लहानपणी त्याला सूर्याला पकडण्याची इच्छा झाली आणि हनुमानाने सूर्याच्या दिशेने झेप घेतली सूर्याला व पृथ्वीला वाचविण्यासाठी इंद्राने आपल्या वज्राने हनुमानावर प्रहार केले.ते प्रहार हनुमानाचे हनुवटीला लागले आणि हनुमान बेशुद्ध पडला. हे जेव्हा वायुदेवाला कळले तेव्हा वायुदेवाने सर्व पृथ्वीवरील हवा हवा बंद केली. आणि पृथ्वीवरील सजीव हवेशिवाय जिवंत राहणार नाही. तेव्हा सर्व देवानी मिळून ब्रह्मदेवाला विनंती केली.व हनुमंताला जिवंत केले. आणि वायूदेवाने पुन्हा हवा सुरू केली. तेव्हापासून मारुतीला हनुमान हे नाव प्राप्त झाले.



पुढे श्रीराम वनवासात असताना श्रीरामाची व हनुमानाची भेट झाली. रावणाने माता सीतेचे अपहरण केले तेव्हा हनुमानाने समुद्रावर उड्डाण करून लंका गाठली आणि प्रभू रामाचा निरोप माता सीतेला दिला. लंकाधिपती रावणाच्या सैनिकांनी त्याला पकडून रावणा समोर उभे केले व त्याचा शेपटीला कापडाच्या चिंध्या बांधून त्याला आग लावली तेव्हा मारुतीने उड्या मारून संपूर्ण सोन्याच्या लंकेला आपल्या शेपटीने आग लावली आणि परत जाऊन सीतेचे वर्तमान प्रभू श्री रामाला जाऊन सांगितले. प्रभू श्री राम आणि रावणाचे युद्ध झाले तेव्हा लक्ष्मणाला बाण लागून बेशुद्ध पडला होता. तेव्हा त्याच्या उपचारासाठी संजीवनी जडीबुटीची आवश्यकता होती. तेव्हा हनुमानाने हिमालयातुन द्रोणगिरी पर्वत उचलून आणले. आणि त्या संजीवनी जडीबुटीने लक्ष्मण शुद्धीवर आले. हनुमान हा एक चिरंजीवी आहे. म्हणजेच हनुमान अजूनही जिवंत असल्याची मान्यता आहे. जगात ज्या ज्या ठिकाणी जेव्हा-जेव्हा रामाचे नाव घेतले जाते तेथे हनुमान हजर असतो असे म्हणतात. महाभारतात सुद्धा मारुतीचा उल्लेख आलेला आहे. पांडव आणि कौरवाच्या युद्धाच्या वेळी अर्जुनाचा रथाच्या ध्वजावर हनुमान विराजमान होता असे म्हटले जाते.


**सौ.ज्योत्स्ना भास्कर बन्सोड**
**कुरखेडा जि.गडचिरोली**

## हनुमान जयंती उत्सव ( चैत्रशुद्ध पौर्णिमा )

ब्राह्मतेज व क्षात्रतेजाचे प्रतीक म्हणजे परमरामभक्त हनुमंत की जे भक्ती , शक्तीसामर्थ्य व बुद्धी यांची प्रेरणा आहे आणि हनुमंत रायची समर्पण वृत्ती पाहूनच प्रभुरामाच्या सीतामाईने हनुमंताला अमरत्वाचे वरदान दिलेले आहे म्हणून हनुमंत हा चिरंजीवी आहे. मनोजवं मारुतीतुल्यवेगं जितेंद्रियम बुद्धिमतांवरिष्ठम असे प्रभूरामचंद्र यांचा भक्त वीर हनुमंत याचे वर्णन प.पू. रामदास स्वामी यांनी लिहिलेल्या भीमरुपी या मारुतीस्तोत्रामध्ये अत्यन्त प्रासादिक शब्दात केलेले आहे. चैत्रशुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढीपाडवा " चैत्रशुद्ध नवमी म्हणजे रामनवमी तर चैत्रशुद्ध पौर्णिमा म्हणजे हनुमान जयंती रामनवमी नंतर बरोबर 15 दिवसांनी रामभक्त हनुमंत यांचा जन्म झाला असून तो सर्वत्र अत्यन्त उत्साहाने साजरा केला जातो. हनुमंत ( मारुती) ही बुद्धी आणी शक्तीची देवता मानली जाते. भारतीय धर्मग्रँथामध्ये रामायण महाभारत या हिंदूंच्या धर्मग्रंथात याचे व त्या कालावधीचे वर्णन केलेले आहे. पौराणिक कथेत उल्लेखीला प्रमाणे चक्रवर्ती राजा दशरथाने पुत्रप्राप्ती प्रित्यर्थ पुत्रकामेष्टी यज्ञ केला होता त्या प्रसंगी त्या पवित्र यज्ञातुन प्रत्यक्ष अग्निदेव प्रकट झाले होते व त्यांनी राजा दशरथाच्या तिन्ही म्हणजे कौसल्या , सुमित्रा , कैकयी या महाराण्यासाठी पायस ( खिरीचा प्रसाद ) दिला होता. त्या प्रसादामुळे राजा दशरथाच्या सर्व राण्यांना पुत्रप्राप्ती झाली आणी प्रभूरामचंद्र , लक्ष्मण , भरत , शत्रुघन यांचा जन्म झाला . पण तोच प्रसाद योगायोगाने आकाशात भ्रमण करत असलेल्या एका घारीच्या मार्फत एका वनामध्ये एक वानरस्त्री ध्यानस्थ बसली होती तिच्या ओंजळीत पडला त्या वानरीने तो प्रसाद श्रद्धेने ग्रहण केला आणि त्यातून तिच्या पोटी *हनुमंत ( मारुतीराय ) जन्माला आले ही आख्यायिका आहे. या बाबतचे सर्व दृष्टांत हे पौराणिक ब्रह्मान्ड पुराणात आढळतात. *एकनाथी भागवत ग्रंथात देखील हनुमंताच्या जन्माची कथा वर्णन केली आहे. मारुतीरायाचा जन्म हा अंजनेरी पर्वतावर अंजनीच्या पोटी झाला म्हणून हनुमंताचा उल्लेख अंजनीसुत म्हणून केला जातो . हनुमंताच्या वडिलांना वानरराज केसरी म्हणत असत. हनुमंताला जन्मताच अनेक सिध्दी प्राप्त होत्या. हनुमंत बलाढ्य , तेजस्वी ,पराक्रमी होता. स्वर्गाधी देव देखील त्याच्या पराक्रमाने भयभीत झाले होते. या पराक्रमी हनुमंताच्या अनेक कथा पुरणात ऐकण्यास मिळतात. पुढे रामायणात प्रभुरामचंद्र वनवासात असताना हनुमंताची व रामसीतालक्ष्मण यांची भेट झाली. पुढीलसर्वइतिहाससर्वश्रुतआहे. आजही हनुमंत चिरंजीव आहे. जिथे जिथे रामनाम घेतले जाते, रामस्तुती केली जाते तिथे तिथे प्रत्यक्ष रामभक्त हनुमंत उपस्थित असतात अशी श्रद्धावान लोकांची श्रद्धा आहे. हनुमंताला मारुती ,, बजरंगबली , अंजनीसूत , महावीर , पवनपुत्र , केशरीनंदन अशा अनेक नावांनी संबोधले जाते. गदा हे त्याचे शस्त्र आहे. त्याला शंकराचा अवतारही मानले जाते. या कलियुगातील संकट हरण करणारी शक्तीदेवता म्हणजे हनुमंत असे मानले जाते.

# जातीयवादी शक्तीला रोखण्या साठी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचा

## बजरंग सोनवणे यांना बिनशर्त जाहीर पाठिंबा - विजय साळवे





माजलगाव : ( प्रतिनिधी ) स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष विजय साळवे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे महाराष्ट्र अध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड लोकसभेचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना बिनशर्त पाठिंबा दिला असल्याचे जाहीर केले आहे. देशात व महाराष्ट्रात एस.सी., एस. टी. ओबीसी यांना नोकऱ्यांमध्ये आरक्षणास विरोध करणारी ही जातीयवादी शक्ती समाजात समाजात तेढ निर्माण करणाऱ्या व महिलांना तुच्छतेची वागणूक देणाऱ्या देशाची राज्यघटना बदलू पाहणाऱ्या संविधान विरोधी तसेच लोकशाहीची हत्या करणाऱ्या भाजपा सारख्या जातीयवादी विचारधारेला रोखण्यासाठी , पुरोगामी विचारांच्या शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांशी प्रामाणिक असणाऱ्या महाविकास आघाडीतील घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटातील बीड लोकसभेचे अधिकृत उमेदवार श्री बजरंग बप्पा सोनवणे यांना स्वाभिमानी रिपब्लिकन सेना चे सरसेनापती मा. विजयदादा साळवे यांनी मा. जयंत पाटिल यांच्या उपस्थितीत दिनांक २२ एप्रिल रोजी बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. प्रसंगी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे कार्याध्यक्ष पंडित ओव्हाळ, अंजेराम घनघाव , प्रदिप सिरसाट , राजकुमार मोरे , शेख मजहर , वैजनाथ गडसिंग , सय्यद अन्वर, भास्कर पौळ, सुबोध गायसमुद्रे , विलास पाईकराव , वशिष्ठ लांडगे , विशाल ससाने , विश्वनाथ तोडके , छगन जाधव , सोनजी गानकवाड , राजेश टाकणखार , बाळु साळवे , राहूल गायकवाड , कन्हेया बनगे , राहूल सिरसट , गणेश जाधव , निवृत्ती गायकवाड , रामा जाधव, विलास खळगे , बाळु तुपारे , बबन चोपडे , बाबा गाडेकर , महादु उघडे , आबा चांदमारे , राहुल सिरसट , अशोक निकाळजे यांची उपस्थिती होती.

## मोटार सायकल रॅली काढून उद्या करनार उमेदवारी अर्ज दाखल :- संतोष रासवे..

माजलगाव (प्रतिनिधी) भव्य मोटर सायकल रॅली काढून उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे मत अपक्ष उमेदवार संतोष रासवे यांनी व्यक्त केले पुढे बोलताना संतोष रासवे म्हणाले भारतीय जनता पार्टी देशातील जनतेला मुर्खात काढत आहे एकीकडे भाजपाचा डीएनए ओबीसी समाज आहे असे म्हणायचे आणि एकीकडे प्रचार बॅनर वरती भुजबळांचा फोटो टाळायचा ही कुठली रणनीती आहे महाराष्ट्रात काही असो बीड जिल्ह्यात पंकजाताईंनी भुजबळांचा फोटो प्रचार बॅनर वर घ्यायला हवा होता मात्र तो मुद्दामहून टाळाला याचा ओबीसी मनावर खूप मोठा परिणाम झाला हेच शैल्य भाजपा ओबीसी द्रोही असल्याचा परिणाम करून गेले भारतीय जनता पार्टी ओबीसींचा फक्त वापर करून घेत आहे हे लक्षात घेऊन मी अपक्ष उमेदवारी दाखल करण्याचा निर्णय घेतला यामुळे भव्य मोटार सायकल रॅली काढून उमेदवारी दाखल करणार असल्याचे संतोष रासवे यांनी सांगितले बीडमध्ये रॅली आल्यानंतर महात्मा फुले अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर अण्णाभाऊ साठे शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात आपण उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे तरी ओबीसीचा आवाज म्हणून मला ओबीसी मतदार बांधवांनी संसदेत पाठवा मी ओबीसी बांधवांच्या आरक्षणावर येणारी सर्व संकटा फेटाळून लावेल संतोष रासवे यांनी सांगून मला प्रचंड मताधिकाने विजय करा अशे आवाहन केले व बीड जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांनी व माजलगाव तालुक्यातील पंचक्रोशीतील



कार्यकर्त्यांनी उद्या मोटरसायकल रॅलीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन.अनंत आढाव यानी केले आहे.

## राठोड यांच्याकडे नरेगाच्या गटविकास अधिकारी पदाचा अतिरिक्त कारभार

**बीड प्रतिनिधी**

बीड पंचायत समितीमधील कृषी विभागातील राठोड ए.जी. यांच्याकडे नरेगाचा गटविकास अधिकारी पदाचा अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला आहे. सदरील हा कारभार मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी त्यांच्याकडे सोपविला आहे. राठोड हे गेल्या अनेक वर्षांपासून बीड पंचायत समिती कृषी विभागात कार्यरत आहेत. त्यांच्याकडे आता नरेगाच्या गटविकास अधिकारी पदाचा अतिरिक्त कारभार सोपविण्यात



आला आहे. सदरील हा कारभार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांच्या स्वाक्षरीने देण्यात आला आहे. त्यांच्या या नियूक्तीबद्दल त्यांचे कर्मचाऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

# दिव्यांगच धावला दिव्यांगांच्या मदतीसाठी

## दानशूर व्यक्तींनी राजेश ठाकूर यांना मदत करण्याचे विविध दिव्यांग संघटनेतर्फे आवाहन.



**वादळवार्ता/उरण**

विविध सामाजिक संस्था संघटना व दिव्यांग संस्था संघटना यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार एका दिव्यांग व्यक्तीला आर्थिक मदतीची गरज होती. रुपेश म्हात्रे व दिव्यांग सामाजिक संस्था उरण, शिवशंभो दिव्यांग संघटना, नगरपरिषद उरणचे कर्मचारी, दिव्यांग कर्मचारी संघटना यांनी तसेच विविध दिव्यांग सामाजिक संस्था संघटना यांनी केलेल्या आवाहनाला योग्य तो प्रतिसाद मिळाला आहे.एक दिव्यांग व्यक्तीच्या मदतीसाठी सर्व दिव्यांग धावून गेले आहेत.उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी राजेश ठाकूर यांना मदतीचा हात दिला आहे. सारडे गावात राहणारे राजेश धनाजी ठाकूर हा गरीब कुटुंबातला मुक - बधिर दिव्यांग मुलगा कुठेही मिळेल तिथे लेबर चा काम करायचा ,काही दिवसांपूर्वी तो आजारी पडला त्याची पूर्ण बॉडी चेक अप केली तेव्हा समजल की त्याला हाडाचा कॅंसर झाला, औषधे चालु केली पण आताच्या घडीला दोन-दोन दिवसांनी त्याला डायलिसिस करण्यासाठी खारघर येथे हॉस्पिटल मध्ये घेऊन जावे लागते ही बाब लक्षात येताच सर्वांनी त्याला मदतीचा हात दिला आहे.दिव्यांग सामाजिक संघटना उरण, शिवशंभो दिव्यांग संघटना, उरण नगर परिषदेचे कर्मचारी,दिव्यांग कर्मचारी संघटना यांनी दिव्यांग राजेश ठाकूर यांना मदत केली आहे .एक दिव्यांग दुसऱ्या आजारी दिव्यांग बांधवांला मदत करायला पुढे आला आहे यावरून आज हेच दिसून आले की अजूनही माणुसकी जिवंत आहे. माणसाने माणसाशी माणसासम वागणे , एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ या उक्ती नुसार प्रत्यक्ष मदत करून गरीब राजेश ठाकूर यांना मदत करण्यात आली. सारडे येथील दिव्यांग बांधव राजेश ठाकूर हे एक दीड वर्षाची मुलगी आणि सातवीत शिकणारा मुलगा आणि पत्नीसह कुटुंब जगत आहेत. त्या दिव्यांग कुटुंबातील कर्त्या पुरुषाला लवकर बरा होऊ दे अशी प्रार्थना सर्व दिव्यांग बांधव व विविध सामाजिक संस्था, संघटना, दिव्यांग संघटनेचे पदाधिकारी सदस्यांनी केली असून विविध क्षेत्रातील दानशूर व्यक्तींनी दिव्यांग राजेश ठाकूर यांना सढळ हाताने मदत करावी असे आवाहन केले आहे.

### दिव्यांग राजेश ठाकूर यांना कोणाला आर्थिक मदत करायची असल्यास खालील बँक खात्यात करू शकता.

खातेदाराचे नाव :राजेश धनाजी ठाकूर बँकेचे नाव -युनियन बँक, शाखा कोप्रोली (उरण), तालुका उरण, जिल्हा रायगड. अकॉउंट नंबर -618002010002039

आयएफएससी कोड -UBIN0561801

# जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासा साठी बजरंग बाप्पांना विजयी करा : सद्दाम (शद्दु) खतीब

**वादळवार्ता/केज**

भाजपाचा जाहीरनामा प्रसिध्द झाला आहे. त्यामध्ये अल्पसंख्यक विरोधी समान नागरी कायदा सी.ए.ए, एन. आर.सी सह इतर कामे करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.भाजपाच्या जाहीरनाम्याचे विरोध म्हणुन बीड लोकसभा मतदार संघातून बजरंग बप्पा सोनवणे यांना भरघोस मते देवून देशाच्या संसदेत पाठविणे आज गरजेचे असुन जिल्ह्यातील मुस्लिम समाज व अल्पसंख्यक समुदायने बजरंग सोनवणे यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. मतदानाच्या दिवशी आपले वेळ काढून बहुमूल्य मतदान करावे असे आवाहन सद्दाम (शद्दु) खतीब यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे. भाजपाने आपला जाहिरनामा प्रसिध्द केला त्या मध्ये मुस्लिम समाजाला लक्ष करण्यात आले आहे. खरंतर या जाहिरनाम्यामध्ये अल्पसंख्यांक समुदायाचे प्रश्न कसे सोडवण्यात येतील हे मांडणे आवश्यक असताना सीएए ,एन.आर.सी सारख्या विभाजनकारी कायद्यांचे आश्वासन देण्यात आले आहे एका समाजाला लक्ष करून ईतर समाजाचे मत आपल्या झोळीत पडावे या साठीच समाजात विभाजन करणारे कायद्याचे वचन देण्यात आले आहे. मुंडे दहा वर्षापासुन खासदार आहेत. या दहा वर्षात त्यांनी जिल्ह्यात अल्पसंख्यक समाज केंद्रित असे एकही काम केल्याचे सांगावे. जिल्ह्यातील अल्पसंख्यांक बहुल वस्त्यांमध्ये आपल्या खासदार फंडातून १ रूपयाही खर्च केल्याचे दिसुन येत नाही. खा.प्रितम मुंडे यांनी आपल्या वचन नाम्यात अल्पसंख्याक समाजासाठी दोन आश्वासने दिले होते. त्यामध्ये मुस्लिम मुलांच्या शिक्षणासाठी अक्कलकुवा सारखे विद्यापिठ स्थापन करण्याचे व त्याच सोबत मुस्लिम महिलांच्या कौशल्य विकासा साठी विशेष प्रशिक्षण केंद्र उभारले जाईल पण दहा वर्षात ताईंने एकही काम केल्याचे दिसुन येत नाही. म्हणुन फक्त आश्वासने देणाऱ्या या उमेदवाराला आता बीडची जनता घरचा रस्ता दाखविल्याशिवाय राहणार नाही. म्हणुन १३ मे २०२४ ला जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी बजरंग बाप्पांना विजयी करा असे आवाहन सद्दाम (शद्दु) खतीब यांनी केले आहे



# बहराई फॉउंडेशन तर्फे स्वच्छता मोहीम.
## पर्यावरण पूरक उपक्रम राबवून साजरा केला जागतिक वसुंधरा दिन



**उरण/विठ्ठल ममताबादे**

'बहराई फाउंडेशन' या पर्यावरण व निसर्गप्रेमी संस्थेतर्फे उरण तालुक्यातील कळंबुसरे येथील इंद्रायणीच्या डोंगरावरील 'श्री एकवीरा देवी'च्या मंदिरापासून अगदी पायथ्या पर्यंत स्वच्छता व याच सोबत तेथील एका रानवाटेवर पाणवठा तयार करण्यात आले.२२ एप्रिल या जागतिक वसुंधरा दिवसाच्या निमित्ताने, पृथ्वीला हानी पोहोचवत असलेले वाढते प्रदूषण आणि प्लास्टिक वापराचा अतिरेक यावर जनजागृती म्हणून 'स्वच्छता मोहीम' राबविण्यात आले . याचबरोबर सध्याच्या असह्य उष्णतेमुळे माणसाबरोबर वन्यजीवांची होणारी होरपळ लक्षात घेऊन, पाण्याचं दुर्भिक्ष असलेल्या रानवाटेवर वन्यजीवांना पाण्याची व्यवस्था म्हणून एक कृत्रिम पाणवठा तयार करण्यात आला. पुढील काही दिवसांत उरणमध्ये आणखीन काही ठिकाणी पक्षांना पाण्याची व्यवस्था म्हणून मातीची भांडी ठेऊन त्यात नियमित पाणी भरण्याची व्यवस्था बहराई कडून करण्यात येणार आहे. इंद्रायणी डोंगरावर याआधी दसऱ्याच्या निमित्ताने २४ ऑक्टोबर रोजी देखील 'बहराई' कडून स्वच्छता करण्यात आली होती.सदर कार्यक्रमात श्रमदान करण्यासाठी 'बहराई फाउंडेशन'चे सदस्य अंकिता ठाकूर, पूजा वाकळे, अदिती, कांचन, आशिष, रामनाथ पाटील, दौलत, रोशन, कानिष यांसोबत कोषाध्यक्ष सुरेंद्र पाटील, सचिव वैभव पाटील व उपाध्यक्ष अंगराज म्हात्रे इत्यादी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# अब की बार, चारसो बीस भाजप हद्दपार करा - पुजाताई मोरे



बीड / गेवराई :- अब की बार हे बनवाबनवी करण्यात तरबेज असलेले व फसव्या घोषणा करणारे चारसो बीस भाजप हद्दपार करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षा पुजाताई मोरे यांनी तलवडा (ता. गेवराई) येथे कॉर्नर सभेत केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ तलवाडा (ता. गेवराई) येथे आयोजित कॉर्नर सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षा पुजाताई मोरे या बोलत होत्या. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित, युवा नेते युद्धजित पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना पुजाताई मोरे यांनी भाजपच्या अबकी बार.... या घोषणेचा खरपूस समाचार घेत केंद्रात आणि राज्यात भाजपा सरकार असताना जिल्ह्यात पंकजा मुंडे, प्रितम मुंडे, धनंजय मुंडे हे रोजगार निर्मिती व विकासाच्या बाबतीत कुचकामी आहेत. असा आरोप ही त्यांनी केला. अशा बिनकामाच्या भाजप उमेदवाराला मतदान करून मतदान वाया घालवू नका असे म्हणत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना मतदान करीत निवडून आणावे. असे आवाहन केले.

# स्व.विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यान माला : पुष्प- २ रे
## संतुलित आहार हे निरोगी आरोग्याचे लक्षण-डॉ.दिनकर राऊत

**बादळवार्ता/केज**

अलीकडे माणसांचं संघर्ष मय जीवन पाहिलं कि कोणालाही परिपूर्ण आरोग्यसंपन्न जीवनजगणे कठीण झाले आहे. जीवना तील ताणतणाव,अति हव्यास,असंतुलित आहार बदलती जीवनशैली या सर्व बाबी अनेक प्रकारे आपल्या शरीरस्वास्थ्यावर परिणाम करत असतात. यामुळे आपल्या शरीराच संतुलन बिघडतं आणिमग आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात.आरोग्य म्हणजे स्थूल मानाने शारीरिक, मानसिक,सामाजिक, संतुलनाची स्थिती होय. आरोग्यास असंतुलन निर्माण झाल्यास रोग जडतात.जी व्यक्तीआपली सामाजिक भूमिका सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी शारीरिक, मानसिक,दृष्ट्या सक्षम असते,ती आरोग्यसंपन्न मानली जाते. म्हणून कार्यात्मक योग्यता हा स्वास्थ्याचा मुख्य निकष आहे असे प्रतिपादन डॉ. सुधिर फत्तेपुरकर यांनी केले. केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि.२१ एप्रिल रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्व.विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे दुसरेपुष्प गुंफण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून लातूर येथील डॉ. सुधिर फत्तेपूरकर,अश्विनी ॲक्सिडेंट अँड न्यूरोकेअर सेंटर लातूर हे उपस्थित होते तर अध्यक्ष म्हणून डॉ.दिनकर राऊत,योगिता नर्सिंग होम,बाल रुग्णालय केज हे उपस्थित होते.या प्रसंगी जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे,उपाध्यक्ष डॉ. पांडुरंग तांदळे,नारायण अण्णा अंधारे,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, गणेश कोकिळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी लाभलेल्या उपस्थित पाहुण्यांचा परिचय मेघशाम मंगरूळकर यांनी दिला. दुसरे पुष्प गुंफताना त्यांनी "मानवी जीवनातील आरोग्य संपन्नता" या विषयावर बोलताना डॉ. सुधिर फत्तेपूरकर म्हणाले, सध्याच्या काळामध्ये आरोग्य संपन्नतेपेक्षा आर्थिक संपन्नतेवरअधिक भर दिला जात आहे.जे आजार वयाच्या सत्तरी नंतर व्हायचे ते आता तिशी नंतर होत आहेत, त्यामध्ये पक्षाघात (लकवा) पक्षाघात म्हणजे मेंदू आघात,जेव्हा रक्त नलिका बंद होते किंवा फुटते



म्हणजेच मेंदूच्या पेशी मृत होतात तेव्हा पक्षाघात होतो. ही एक आपत्कालीन स्थिती आहे. याप्रसंगी बोलताना हा आजार कोणत्या कारणा मुळे होतो तो कसा ओळखावा त्याची वैशिष्ट्ये कोणती,याविषयी मार्गदर्शन करताना प्रोजेक्टरच्या मदतीने उपस्थितांना सखोल असे मार्गदर्शन केले.शेवटी ते म्हणाले,"उपचारापेक्षा प्रतिबंध बरा,सुखी जीवनाचा हाच मंत्र खरा"अध्यक्षीय समारोपात डॉ. दिनकर राऊत म्हणाले, संतुलित आरोग्याची काळजी आहार,व्यायाम,शांतता, स्वच्छता,मानसिकता ही वैशिष्ट्ये आहेत,आजच्या काळामध्ये अनुभवासह जीवनामध्ये अपडेट होणे गरजेचे आहे.संतुलित आहार हे निरोगी आरोग्याचे लक्षण आहे. आहार हा शाकाहारी व सात्विक असला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने जीवन जगत असताना आनंद मिळणाऱ्या गोष्टींमध्ये रमले पाहिजे.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन महादेव गिरी यांनी केले तर आभार प्रबोधकांत समुद्रे यांनी मानले.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )